## साखरा येथील जि.प.शाळेने घडविला इतिहास...

# ‘माझी शाळा, सुंदर शाळा’ स्पर्धेत महाष्ट्रातुन प्रथम !

**●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●**

‘मुख्यमंत्री’ ‘माझी शाळा, सुंदर शाळा’ या योजनेअंतर्गत भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा साखरा, पंचायत समिती वाशिम, जिल्हा परिषद वाशिम. या शाळेला ’मुख्यमंत्री’ ’माझी शाळा,सुंदर शाळा’ या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रामध्ये प्रथम पारितोषि पटकावुन जिल्ह्याचे नावलौकिक केले आहे.

जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, जिल्हाधिकारी एस. बुवनेश्वरी, जि. प. चे सीईओ वैभव वाघमारे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा आरोग्य व शिक्षण सभापती चक्रधर गोटे, शिक्षणाधिकारी राजेंद्र शिंदे यांनी शाळेतील सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. साखरा शाळेला हा बहुमान मिळवण्यासाठी जिल्हा प्रशासनाबरोबर, जिल्हा परिषदचे सर्व पदाधिकारी, अधिकारी आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र महाले आणि सर्व सदस्य, ग्रामपंचायत सरपंच अनिताताई पांडुरंग राऊतयांच्यासह ग्रामपंचायतचे सर्व सदस्य आणि मुख्याध्यापक अंबादास कऱ्हे यांच्यासह सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

समस्त गावकरी मंडळी आणि विद्यार्थी यांनीही अथक परिश्रम घेऊन शाळेला हा बहुमान प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

जि. प. चे माध्यमिक शिक्षणाधिकारी अहाळे, उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, उप शिक्षणाधिकारी गजानन बाजड, गट विकास अधिकारी गजानन खुळे, केंद्रप्रमुख अशोकराव महाले, केंद्रप्रमुख आनंद सुतार यांचेही मार्गदर्शन शाळेला लाभले आहे.





‘साखरा येथील जि. प. शाळा राज्यात प्रथम ठरली ही बाब आपल्या जिल्ह्यासाठी गौरवाची आणि सर्व जि.प. शाळांसाठी प्रेरणादायी आहे. यासाठी या शाळेतीचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मनापासुन खुप खुप अभिनंदन. तसेच शाळा व्यवस्थापन समितीसह शाळेच्या विकासात योगदान दिलेल्या सर्वसामान्य नागरिकांचेही खुप खुप अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा. जिल्ह्यातील इतर शाळा सुध्दा साखरा जिल्हा परिषद शाळेपासून प्रेरणा घेऊन त्यांच्या पावलावर पाऊल टाकत पुढे जातील अशी आशा आहे.’ **वैभव वाघमारे,** सीईओ जि.प. वाशिम



‘गुणवत्तेच्या नावाखाली पालकांचा कल खाजगी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे असतांना साखरा सारख्या शाळांचा आदर्श जिल्हा परिषद शाळेच्या सर्व शिक्षकांनी घेण्यासारखा आहे.

**-चंद्रकांत ठाकरे,**
अध्यक्ष, जि.प. वाशिम

| State Ranking_Govt | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| State level | School Code | School Name | Management Group | Dist_name | Total Marks |
| | 27060604201 | ZPPS SAKHARA | Local Body/Govt. | Washim | Rank-1 |
| | 27240205801 | Raigad Zillha parishad Primary School Hedwali | Local Body/Govt. | Raigarh | Rank-2 |
| | 27350302501 | Z. P. SCHOOL DHALEWADI | Local Body/Govt. | Sangli | Rank-3 |

| State Ranking_private | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| State level | School Code | School Name | Management Group | Dist_name | Total Marks |
| | 27200900304 | ESPALIER HERITAGE SCHOOL BELGAON DHAGA | Private | Nashik | Rank-1 |
| | 27250211005 | SHARDABAI PAWAR VIDYANIKETAN , SHARDANAGAR | Private | Pune | Rank-2 |
| | 27190221117 | BHONDWE PATIL SCHOOL BAJAJNAGAR | Private | Ch.sambhajinagar | Rank-3 |

| | | Local body | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2701DD_Mumbai DYD | School Code | School Name | District Name | Management Group | Merit Number | Div_ranking |
| | 27211222003 | Z.P. SCHOOL, VASHIND NO.1 | 2721_THANE | Local Body/Govt. | 1-DyDir Level | Div_Rank 1 |
| | 27361112701 | Z.P.SCHOOL, NAVGHAR | 2736_PALGHAR | Local Body/Govt. | 2-DyDir Level | Div_Rank 2 |
| | 27241117501 | N.P. ROHA URDU SCHOOL | 2724_RAIGAD | Local Body/Govt. | 3-DyDir Level | Div_Rank 3 |
| | | Private | | | | |
| | School Code | School Name | District Name | Management Group | Merit Number | |
| | 27240806133 | RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL ,KHARGHAR | 2724_RAIGARH | Private | 1-DyDir Level | Div_Rank 1 |
| | 27210600310 | BIRLA SECONDARY SCHOOL | 2721_THANE | Private | 2-DyDir Level | Div_Rank 2 |
| | 27361905803 | Aspee children academy | 2736_PALGHAR | Private | 3-DyDir Level | Div_Rank 3 |

| | | Local body | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2702DD_Pune | School Code | School Name | District Name | Management Group | Merit Number | |
| | 27251301301 | ZPPS PABE | 2725_PUNE | Local Body/Govt. | 1-DyDir Level | Div_Rank 1 |
| | 27260307701 | Z.P.P.SCHOOL SANVATSAR | 2726_AHMADNAGAR | Local Body/Govt. | 2-DyDir Level | Div_Rank 2 |
| | 27300806306 | ZPPS CHICHANI | 2730_SOLAPUR | Local Body/Govt. | 3-DyDir Level | Div_Rank 3 |
| | | | | | | |
| | | private | | | | |
| | School Code | School Name | District Name | Management Group | Merit Number | |
| | 27261003921 | PRAVARA KANYA VIDYA Mandir and Jr.College LONI K | 2726_AHMADNAGAR | Private | 1-DyDir Level | Div_Rank 1 |
| | 27301106003 | SHRI BASAVESHWAR SEC. & HIG. SEC. SCHOOL, NIMB | 2730_SOLAPUR | Private | 2-DyDir Level | Div_Rank 2 |
| | 27250702718 | GURUVARYA R P SABNIS VIDYAMANDIR NARAYANGA | 2725_PUNE | Private | 3-DyDir Level | Div_Rank 3 |

| | | Local body | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2703DD_nashik | School Code | School Name | District Name | Management Group | Merit Number | |
| | 27200405801 | Z.P.PRI SCHOOL JAULKE DINDORI | 2720_NASHIK | Local Body/Govt. | 1-DyDir Level | Div_Rank 1 |
| | 27030508501 | Z.P. PRI. SCH. UPKHED | 2703_JALGAON | Local Body/Govt. | 2-DyDir Level | Div_Rank 2 |
| | 27020501909 | SHASKIY VIDYA NIKETAN | 2702_DHULE | Local Body/Govt. | 3-DyDir Level | Div_Rank 3 |

# वाशीम जिल्ह्यातील साखऱ्याची शाळा राज्यात अव्वल

■ **'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानाचा निकाल जाहीर**

**म. टा. वृत्तसेवा, वाशीम**

राज्यात राबविण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानात वाशीम जिल्ह्यातील साखरा येथील भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेने राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या अभियानाचा निकाल रविवारी जाहीर करण्यात आला.

वाशीमसारख्या आकांक्षित जिल्ह्यातील शाळेने ६४ हजार ३१२ शासकीय शाळांमधून प्रथम क्रमांक पटकावल्याने शाळेतील कर्मचाऱ्यांचे, शिक्षण विभागाचे सर्वदूर कौतुक होत आहे. या स्पर्धेत राज्यात द्वितीय क्रमांक रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हेदवली, तृतीय क्रमांक सांगली जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा घालेवाडी यांनी मिळवला आहे. राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळवल्यामुळे साखऱ्याच्या शाळेला ५१ लाखांचे, हेदवली शाळेला २१ लाखाचे तर घालेवाडी शाळेला ११ लाख रुपयांचे बक्षिस मिळणार आहे. जवळपास विविध स्तरावर ६६ कोटी १० लाखांचे बक्षिसे देण्यात आलेली आहेत. या स्पर्धेचे बक्षीस वितरण ५ मार्च रोजी मुंबई येथे आयोजित एका समारंभात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रीद्वय देवेंद्र फडणवीस, अजित पवार व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या उपक्रमात १ लाख ३ हजार ३१२ शाळांनी सहभाग घेतला. त्यामध्ये ६४ हजार ३१२ शासकीय शाळा आणि ३९ हजार खासगी माध्यमिक शाळांनी सहभाग नोंदविला.



**वाशीम जिल्ह्यातील साखरा येथील जिल्हा परिषदेची शाळा.**

**जिल्ह्यासाठी गौरव: वैभव वाघमारे**

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा साखरा ही राज्यस्तरावर प्रथम ठरली. ही जिल्ह्यासाठी अभिमानाची आणि गौरवाची बाब आहे, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी वैभव वाघमारे म्हणाले.

**नावलौकिक वाढवला : ठाकरे**

गुणवत्तेच्या नावाखाली पालकांचा कल खासगी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे जात असताना साखरा सारखी शाळा राज्यात प्रथम येते ही बाब जिल्ह्याचा नावलौकिक वाढवणारी आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांनी केले.

## थुगाव, भोकरची शाळा विभागात प्रथम

**नागपूर :** नागपूर विभागात शासकीय शाळांच्या गटात नागपूर जिल्ह्यातील थुगाव निपाणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने प्रथम तर गोंदिया जिल्ह्यातील सावली जिल्हा परिषद शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला. गडचिरोली जिल्ह्यातील जोगीसाखरा येथील शाळेने तृतीय क्रमांक मिळविला. नागपूर विभागातील खासगी शाळांमध्ये गडचिरोली येथील गोंडवाना सैनिकी विद्यालयाने प्रथम, नागपूर जिल्ह्यातील बाबुलवाडा येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयाने द्वितीय तर भंडारा जिल्ह्यातील जामनापूर येथील नवजीवन विद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला. अमरावती विभागात शासकीय शाळांच्या गटात बुलढाणा जिल्ह्यातील भोकर येथील जिल्हा परिषद शाळेने प्रथम, अमरावती जिल्ह्यातील शेंदुरजनाखुर्द येथील जिल्हा परिषद शाळेने द्वितीय आणि अकोला जिल्ह्यातील बोर्डी येथील जिल्हा परिषद शाळेने तृतीय क्रमांक मिळविला. खासगी शाळांच्या गटात अमरावती विभागात यवतमाळ येथील न्यू इंग्लिश ज्युनियर कॉलेजने प्रथम, बुलढाणा जिल्ह्यातील कोलवद येथील विद्याविकास विद्यालयाने द्वितीय आणि अकोला जिल्ह्यातील आळेगाव येथील प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटने तृतीय क्रमांक पटकावला आहे.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ सोमवार, ४ मार्च २०२४


# साखरा येथील जिल्हा परिषद शाळेने घडविला इतिहास !

## ‘माझी शाळा, सुंदर शाळा’ या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रात प्रथम

■ प्रतिनिधी | वाशिम ■

'मुख्यमंत्री' 'माझी शाळा, सुंदर शाळा' या योजनेअंतर्गत भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा साखरा, पंचायत समिती वाशिम, जिल्हा परिषद वाशिम. या शाळेला 'मुख्यमंत्री' 'माझी शाळा, सुंदर शाळा' या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रामध्ये प्रथम पारितोषिक पटकावुन जिल्ह्याचे नावलौकिक केले आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, जिल्हाधिकारी एस. बुवनेश्वरी, जि. प. चे सीईओ वैभव वाघमारे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा आरोग्य व शिक्षण सभापती चक्रधर गोटे, शिक्षणाधिकारी राजेंद्र शिंदे यांनी शाळेतील सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.




साखरा शाळेला हा बहुमान मिळवण्यासाठी जिल्हा प्रशासनाबरोबर, जिल्हा परिषदचे सर्व पदाधिकारी, अधिकारी आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र महाले आणि सर्व सदस्य, ग्रामपंचायत सरपंच अनिता पांडुरंग राऊत यांच्यासह ग्रामपंचायतचे सर्व सदस्य आणि मुख्याध्यापक अंबादास कहे यांच्यासह सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. समस्त गावकरी मंडळी आणि विद्यार्थी यांनीही अथक परिश्रम घेऊन शाळेला हा बहुमान प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. जि. प. चे माध्यमिक शिक्षणाधिकारी अहाळे, उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, उप शिक्षणाधिकारी गजानन बाजड, गट विकास अधिकारी गजानन खुळे, केंद्रप्रमुख अशोकराव महाले, केंद्रप्रमुख आनंद सुतार यांचेही मार्गदर्शन शाळेला लाभले आहे.

'गुणवत्तेच्या नावाखाली पालकांचा कल खाजगी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे असतांना साखरा सारख्या शाळांचा आदर्श जिल्हा परिषद शाळेच्या सर्व शिक्षकांनी घेण्यासारखा आहे.'

**चंद्रकांत ठाकरे**, अध्यक्ष, जि.प. वाशिम

---

'साखरा येथील जि. प. शाळा राज्यात प्रथम ठरली ही बाब आपल्या जिल्ह्यासाठी गौरवाची आणि सर्व जि.प. शाळांसाठी प्रेरणादायी आहे. यासाठी या शाळेतीचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मनापासुन खुप खुप अभिनंदन. तसेच शाळा व्यवस्थापन समितीसह शाळेच्या विकासात योगदान दिलेल्या सर्वसामान्य नागरिकांचेही खुप खुप अभिनंदन आणि पुढील वाट चालीसाठी शुभेच्छा. जिल्ह्यातील इतर शाळा सुध्दा साखरा जिल्हा परिषद शाळेपासून प्रेरणा घेऊन त्यांच्या पावलावर पाऊल टाकत पुढे जातील अशी आशा आहे.'

**-वैभव वाघमारे,**
सीईओ जि.प. वाशिम

**उपलब्धि** | माझी शाला, सुंदर शाला स्पर्धा में महाराष्ट्र से रहीं प्रथम

# ग्राम साखरा की जिप शाला ने रचा इतिहास

जिला प्रतिनिधि, |वाशिम



मुख्यमंत्री, माझी शाला, सुंदर शाला योजना के अंतर्गत भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी अंतरराष्ट्रीय जिला परिषद उच्च प्राथमिक शाला साखरा, पंचायत समिति वाशिम, जिला परिषद वाशिम इस शाला ने मुख्यमंत्री, माझी शाला, सुंदर शाला स्पर्धा में महाराष्ट्र में प्रथम पुरस्कार प्राप्त कर जिले का नाम चमकाया है। जिला परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, जिलाधिकारी बुवनेश्वरी एस., जिप सीईओ वैभव वाघमारे, जिप उपाध्यक्ष तथा स्वास्थ्य व शिक्षा सभापति चक्रधर गोटे, शिक्षाधिकारी राजेंद्र शिंदे ने शाला के सभी शिक्षकों का अभिनंदन किया है।

साखरा शाला को यह बहुमान मिले, इस हेतु जिला प्रशासन के साथ ही जिला परिषद के सभी पदाधिकारी, अधिकारी, शाला व्यवस्थापन समिति अध्यक्ष राजेंद्र महाले, सभी सदस्य, ग्रामपंचायत सरपंच अनिता पांडुरंग राऊत, ग्रामपंचायत के सभी सदस्य व मुख्याध्यापक अंबादास कव्हे के साथ ही सभी शिक्षकों ने परिश्रम किया।

इसके अलावा समस्त ग्रामीण मंडली ओर विद्यार्थियों ने भी अथक परिश्रम करते हुए शाला को यह बहुमान दिलवाने के लिए प्रयास किए। जिप के माध्यमिक शिक्षाधिकारी आकाश अहाले, उप शिक्षाधिकारी गजानन डाबेराव, उप शिक्षाधिकारी गजानन बाजड, गुट विकास अधिकारी गजानन खुले, केंद्र प्रमुख अशोकराव महाले, केंद्रप्रमुख आनंद सुतार का भी मार्गदर्शन शाला को मिला।

## सभी शिक्षक लें प्रेरणा

गुणवत्ता के नाम पर पालकों का रुझान निजी और अंग्रेजी माध्यम की शालाओं की ओर रहते ग्राम साखरा स्थित जिप शाला का आदर्श जिला परिषद शालाओं के सभी शिक्षकों को लेना चाहिए ।

**अध्यक्ष,** जिला परिषद वाशिम

## जीत का गौरव

सभी शिक्षक और शिक्षकेत्तर कर्मचारियों का दिल से बहुत-बहुत अभिनंदन । इसके अलावा शाला व्यवस्थापन समिति समेत शाला के विकास में योगदान दिनेवाले सर्वसामान्य नागरिकों का भी बहुत-बहुत अभिनंदन। जिले की अन्य शालाएं भी साखरा जिला परिषद शाला से प्रेरणा लेकर उनके नक्शे-कदम पर चलकर आगे बढ़ेंगी, ऐसी आशा है । **सीईओ,** जिला परिषद, वाशिम

TheHitavada
Vidarbha Line | 2024-03-04 | Page- 2
ehitavada.com

# Sakhara ZP school scores big!

showcasing exceptional performance in educational quality, school management, cleanliness, and co-curricular activities.

Under the visionary leadership of Zilla Parishad President Chandrakant Thakare and the relentless efforts of dedicated educators, led by Principal Ambadas Karhe, Sakhara School has set a new standard for quality education. The collaborative support from the district administration, school management committee, and the entire community has been instrumental in this historic win.

Amidst the prevailing preference for private and English medium schools, Sakhara School's triumph underscores the importance of nurturing and celebrating the potential of Zilla Parishad schools. As President Thakare rightly emphasises, their model should inspire others to prioritise quality education over other considerations.

The accolades pour in from all quarters, with District CEO Vaibhav Waghmare extending hearty congratulations to everyone. He lauded the school's achievement as a source of pride for the district and a catalyst for transformation across all Zilla Parishad schools.

This landmark victory not only celebrates the dedication of Sakhara School but also serves as a rallying cry for educational empowerment across Maharashtra. As the school basks in the glory of its success, it paves the way for a brighter future for students and educators alike.

Powered by iDocuments

TheHitavada
Vidarbha Line | 2024-03-04 | Page- 1
ehitavada.com

# Sakhara ZP school scores big!

## Secures top position in 'Mukhyamantri Mazi Shala Sundar Shala' state-level contest




Bharat Ratna Atal Behari Vajpayee ZP School Sakhara staff.

■ **By Ram Dhangar**
WASHIM, Mar 3

IN AN extraordinary achievement, the Bharat Ratna Atal Behari Vajpayee International Zilla Parishad Higher Primary School in Sakhara, Washim district, has clinched the top prize in the prestigious 'Mukhyamantri Mazi Shala, Sundar Shala' competition. This victory marks the first in Maharashtra for the school, elevating its status to a beacon of educational excellence.

Total 1,03,312 schools from Maharashtra contested in this State-level contest. Sakhara School emerged victorious,

*(Contd on page 2)*

Powered by iDocuments

# शासकीय गटात साखरा जिल्हा परिषद शाळा प्रथम

पान १ वरून >

या अभियानात ६६ कोटींपेक्षा अधिक रुपयांच्या बक्षिसांचे वाटप करण्यात येणार आहे. राज्य स्तरावर प्रथम क्रमांक मिळवलेल्या शाळेस ५१ लाख, द्वितीय क्रमांक २१ लाख आणि तृतीय क्रमांकास ११ लाखांचे पारितोषिक देण्यात येणार आहे.

अभियानात राज्यस्तरावर १, मुंबई महापालिका १, अ व ब वर्ग महापालिका १, विभागस्तरीय ८, जिल्हास्तरीय ३६, तालुकास्तरीय ३५८ अशी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची बक्षिसे देण्यात येणार आहेत. मुंबई महापालिका, 'अ' व 'ब' वर्ग महापालिकांच्या कार्यक्षेत्रातील शाळांना पहिले २१ लाख, दुसरे ११ लाख आणि तिसरे पारितोषिक सात लाखांचे असेल. आठ विभागीय स्तरावर पहिले २१ लाख, दुसरे ११ लाख, तिसरे सात लाख रुपयांचे, जिल्हास्तरावर पहिले ११ लाख, दुसरे पाच लाख, तिसरे तीन लाख रुपये, तर तालुकास्तरावर पहिले तीन लाख, दुसरे दोन लाख, तिसरे एक लाख रुपये अशी ६६ कोटी १० लाखांची बक्षिसे देण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री केसरकर यांनी सांगितले.




## 'वाचन सवय प्रतिज्ञेची 'गिनीज बुक'कडून दखल

■ वाचन चळवळीमध्ये १८ लाख विद्यार्थ्यांनी वाचन सवय प्रतिज्ञेत सहभाग घेतला. शिक्षणविषयक हस्तलिखित स्पर्धेत १३ लाख विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून एका दिवसात हस्ताक्षरातील अभिप्रायांचे छायाचित्र संकेतस्थळावर अपलोड केले आहे. याची दखल 'गिनीज बुक'ने घेतली असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियान पेपरलेस पद्धतीने संगणकीय प्रणालीद्वारे राबवण्यात आल्याचे सांगून केसरकर म्हणाले, वीजबचत, आर्थिक साक्षरता, डिजिटल उपकरणांचा वापर, लोकशाही संसदीय मूल्यांचा वापर, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसन याकडे अभियानात विशेष लक्ष देण्यात आले.

# शासकीय गटात साखरा जिल्हा परिषद शाळा प्रथम

## ‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा’ अभियान; रायगडमधील हेदवली शाळेला द्वितीय क्रमांक

**मुंबई/वाशीम, ता. ३ :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत ‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ अभियानातील राज्यस्तरीय पारितोषिकांसाठी निवडलेल्या शाळांची यादी आज जाहीर झाली आहे. राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक शासकीय शाळा गटात वाशीम जिल्ह्यातील साखरा जिल्हा परिषद शाळेने पटकावला आहे. रायगड जिल्ह्यामधील कर्जत तालुक्यातील हेदवली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यातील घालेवाडी जिल्हा परिषद शाळेने अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला आहे. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी आज पत्रकार परिषदेत या पारितोषिक विजेत्या शाळांची माहिती दिली.




पारितोषिक प्राप्त शाळांना ५ मार्चला आयोजित समारंभात पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या दर्जेदार शिक्षणासाठी, तसेच शैक्षणिक गुणवत्ता विकसित होण्यासाठी ‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ हा उपक्रम नियमित राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

पान २ वर ››

“ गुणवत्तेच्या नावाखाली पालकांचा कल खाजगी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे असतांना साखरासारख्या ग्रामीण भागातील शाळांचा आदर्श जिल्हा परिषद शाळांमधील सर्व शिक्षकांनी घेण्यासारखा आहे.

**- चंद्रकांत ठाकरे,**
अध्यक्ष, जि.प. वाशीम

### या आधारे झाले मूल्यांकन

- कागदाचा वापर टाळत संगणकीय प्रणाली राबविणे
- आर्थिक साक्षरता, बीज बचत
- डिजिटल उपकरणाचा वापर, वैज्ञानिक दृष्टिकोन
- लोकशाही मूल्यांचा वापर
- परसबाग, वृक्षसंवर्धन, मूल्यसंस्कार, स्वच्छतेच्या सवयी

### खासगी गटात ‘एस्पेलियर हेरिटेज स्कूल’ प्रथ

खासगी शाळा गटात नाशिक जिल्ह्यातील एस्पेलियर हेरिटेज स्कूल (बेळग धागा) शाळेने पटकावले. शारदाबाई पवार विद्यानिकेतन, शारदानगर (ता. बारामती, जि. पुणे) आणि भोंडवे पाटील शाळा बजाजनगर (ता. गंगापूर, छत्रपती संभाजीनगर) या शाळांनी द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला.

लोकमत

# साखरा जिल्हा परिषद शाळा राज्यात प्रथम

## मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा अभियान



लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** मुख्यमंत्री माझी शाळा - सुंदर शाळा अभियानांतर्गतच्या स्पर्धेत सरकारी शाळा गटातून वाशिम जिल्ह्यातील साखरा (ता. वाशिम) येथील भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळेने राज्यात ५१ लाखांचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकाविले आहे. या निमित्ताने शैक्षणिक क्षेत्रात राज्यात वाशिमचे नाव उंचावले आहे.

मुख्यमंत्री माझी शाळा - सुंदर शाळा या अभियानात राज्यातील एक लाख तीन हजार ३१२ शाळांनी सहभाग नोंदविला होता. शाळांनी केलेल्या कामगिरीचे केंद्र, तालुका, जिल्हा, विभाग व राज्यपातळीवर काटेकोरपणे मूल्यांकन करण्यात आले. ३ मार्च रोजी बक्षीस जाहीर झाले असून, यामध्ये वाशिम जिल्ह्यातील साखरा (ता. वाशिम) येथील आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद शाळेने राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला. मंगळवार, ५ मार्च रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे.

### विद्यार्थिकेंद्रित उपक्रमांमुळे मिळाला पुरस्कार

या अभियानात शाळांना विद्यार्थिकेंद्रित उपक्रमांच्या आयोजनासाठी ६० गुण व शाळा व्यवस्थापनाकडून आयोजित आरोग्य, आर्थिक साक्षरता व कौशल्य विकास, भौतिक सुविधा, तंबाखूमुक्त, प्लास्टिकमुक्त शाळा अशा उपक्रमांसाठी ४० गुण असे एकूण १०० गुण होते. साखरा शाळेने विद्यार्थिकेंद्रित उपक्रमांबरोबरच भौतिक सुविधा, स्वच्छता, निसर्गरम्य वातावरण, तंबाखू व प्लास्टिकमुक्त शाळा, आर्थिक साक्षरता व कौशल्य विकास, आदी घटकांत सर्वोत्कृष्ट गुण मिळविले.

# साखरा येथील जिल्हा परिषद शाळेने घडविला इतिहास

## माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत महाराष्ट्रातून प्रथम

**वाशीम, ३ मार्च**

'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या योजने अंतर्गत वाशीम तालुक्यातील साखरा येथील भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेला मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातून प्रथम पारितोषिक मिळाले आहे.या शाळेने या उपक्रमातून जिल्हड्याचा नावलौकिक केला आहे.

साखरा शाळेला हा बहुमान मिळवण्यासाठी जिल्हा प्रशासनाबरोबर, जिल्हा परिषदेचे सर्व पदाधिकारी, अधिकारी आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र महाले आणि सर्व सदस्य, सरपंच अनिता पांडुरंग राऊत यांच्यासह ग्रा.पं.चे सर्व सदस्य आणि मुख्याध्यापक अंबादास कऱ्हे यांच्यासह सर्व शिक्षकांनी सहभाग घेतला.

समस्त गावकरी मंडळी आणि विद्यार्थी यांनीही शाळेला हा बहुमान मिळावा यासाठी प्रयत्न केले आहेत. जि. प.चे माध्यमिक शिक्षणाधिकारी अहाळे, उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, उप शिक्षणाधिकारी गजानन बाजड, गटविकास अधिकारी गजानन खुळे, केंद्रप्रमुख अशोकराव महाले, केंद्रप्रमुख आनंद सुतार यांचेही मार्गदर्शन शाळेला लाभले आहे.

*(तभा वृत्तसेवा)*

> साखरा येथील जि.प. शाळा राज्यात प्रथम ठरली ही बाब आपल्या जिल्ह्यासाठी गौरवाची आणि सर्व जि.प. शाळांसाठी प्रेरणादायी आहे. यासाठी या शाळेतीचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मनापासून अभिनंदन. तसेच शाळा व्यवस्थापन समितीसह शाळेच्या विकासात योगदान दिलेल्या सर्वसामान्य नागरिकांचेही अभिनंदन जिल्ह्यातील इतर शाळा सुध्दा साखरा जिल्हा परिषद शाळेपासून प्रेरणा घेऊन त्यांच्या पावलावर पाऊल टाकत पुढे जातील अशी आशा आहे.
>
> **-वैभव वाघमारे,** मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. वाशीम

दैनिक विदर्भ जगत
www.vidarbhajagat.in
04 Mar 2024 - Page 4

## 'माझी शाळा,सुंदर शाळा' या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रात प्रथम

# साखरा येथील जिल्हा परिषद शाळेने घडविला इतिहास!

**विदर्भ जगत, वृत्तसेवा**

**● फुलचंद भगत**

◆ ₹साखरा येथील जि. प. शाळा राज्यात प्रथम ठरली ही बाब आपल्या जिल्ह्यासाठी गौरवाची आणि सर्व जि.प. शाळांसाठी प्रेरणादायी आहे. यासाठी या शाळेतीचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मनापासुन खुप खुप अभिनंदन. तसेच शाळा व्यवस्थापन समितीसह शाळेच्या विकासात योगदान दिलेल्या सर्वसामान्य नागरिकांचेही खुप खुप अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा. जिल्ह्यातील इतर शाळा सुध्दा साखरा जिल्हा परिषद शाळेपासून प्रेरणा घेऊन त्यांच्या पावलावर पाऊल टाकत पुढे जातील अशी आशा आहे.₹

◆ -वैभव वाघमारे, सीईओ जि.प. वाशिम



**वाशिम** : "मुख्यमंत्री" 'माझी शाळा, सुंदर शाळा' या योजनेअंतर्गत भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा साखरा, पंचायत समिती वाशिम, जिल्हा परिषद वाशिम. या शाळेला "मुख्यमंत्री" 'माझी शाळा,सुंदर शाळा' या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रामध्ये प्रथम पारितोषि पटकावुन जिल्ह्याचे नावलौकिक केले आहे.

जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, जिल्हाधिकारी एस. बुवनेश्वरी, जि. प. चे सीईओ वैभव वाघमारे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा आरोग्य व शिक्षण सभापती चक्रधर गोटे, शिक्षणाधिकारी राजेंद्र शिंदे यांनी शाळेतील सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. साखरा शाळेला हा बहुमान मिळवण्यासाठी जिल्हा प्रशासनाबरोबर, जिल्हा परिषदचे सर्व पदाधिकारी, अधिकारी आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र महाले आणि सर्व सदस्य, ग्रामपंचायत सरपंच अनिताताई पांडुरंग राऊतयांच्यासह ग्रामपंचायतचे सर्व सदस्य आणि मुख्याध्यापक अंबादास कर्‍हे यांच्यासह सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. समस्त गावकरी मंडळी आणि विद्यार्थी यांनीही अथक परिश्रम घेऊन शाळेला हा बहुमान प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. "गुणवत्तेच्या नावाखाली पालकांचा कल खाजगी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे असतांना साखरा सारख्या शाळांचा आदर्श जिल्हा परिषद शाळेच्या सर्व शिक्षकांनी घेण्यासारखा आहे." -चंद्रकांत ठाकरे, अध्यक्ष, जि.प. वाशिम जि. प. चे माध्यमिक शिक्षणाधिकारी अहाळे, उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, उप शिक्षणाधिकारी गजानन बाजड, गट विकास अधिकारी गजानन खुळे, केंद्रप्रमुख अशोकराव महाले, केंद्रप्रमुख आनंद सुतार यांचेही मार्गदर्शन शाळेला लाभले आहे.

दैनिक
दिव्य मातृछाया

# साखरा येथील जिल्हा परिषद शाळेने घडविला इतिहास!

## 'माझी शाळा, सुंदर शाळा' या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रात प्रथम

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ फुलचंद भगत

**वाशिम :** "मुख्यमंत्री 'माझी शाळा, सुंदर शाळा' या योजनेअंतर्गत भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा साखरा, पंचायत समिती वाशिम, जिल्हा परिषद वाशिम. या शाळेला "मुख्यमंत्री" 'माझी शाळा,सुंदर शाळा' या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रामध्ये प्रथम पारितोषि पटकावुन जिल्ह्याचे नावलौकिक केले आहे.

जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, जिल्हाधिकारी एस. बुवनेश्वरी, जि. प. चे सीईओ वैभव वाघमारे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा आरोग्य व शिक्षण सभापती चक्रधर गोटे, शिक्षणाधिकारी राजेंद्र शिंदे यांनी शाळेतील सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. साखरा शाळेला हा बहुमान मिळवण्यासाठी जिल्हा प्रशासनाबरोबर, जिल्हा परिषदचे सर्व पदाधिकारी, अधिकारी आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र महाले आणि सर्व सदस्य, ग्रामपंचायत सरपंच अनिताताई पांडुरंग राऊतयांच्यासह ग्रामपंचायतचे सर्व सदस्य आणि मुख्याध्यापक अंबादास करहे यांच्यासह सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. समस्त गावकरी मंडळी आणि विद्यार्थी यांनीही अथक परिश्रम घेऊन शाळेला हा बहुमान प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केले आहेत.




◆ साखरा येथील जि. प. शाळा राज्यात प्रथम ठरली ही बाब आपल्या जिल्ह्यासाठी गौरवाची आणि सर्व जि.प. शाळांसाठी प्रेरणादायी आहे. यासाठी या शाळेतीचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मनापासुन खुप खुप अभिनंदन. तसेच शाळा व्यवस्थापन समितीसह शाळेच्या विकासात योगदान दिलेल्या सर्वसामान्य नागरिकांचेही खुप खुप अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा. जिल्ह्यातील इतर शाळा सुध्दा साखरा जिल्हा परिषद शाळेपासून प्रेरणा घेऊन त्यांच्या पावलावर पाऊल टाकत पुढे जातील अशी आशा आहे. -वैभव वाघमारे, सीईओ जि.प. वाशिम

◆ गुणवत्तेच्या नावाखाली पालकांचा कल खाजगी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे असतांना साखरा सारख्या शाळांचा आदर्श जिल्हा परिषद शाळेच्या सर्व शिक्षकांनी घेण्यासारखा आहे. -चंद्रकांत ठाकरे, अध्यक्ष, जि.प. वाशिम

जि. प. चे माध्यमिक शिक्षणाधिकारी अहाळे, उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, उप शिक्षणाधिकारी गजानन बाजड, गट विकास अधिकारी गजानन खुळे, केंद्रप्रमुख अशोकराव महाले, केंद्रप्रमुख आनंद सुतार यांचेही मार्गदर्शन शाळेला लाभले आहे.

पुण्य नगरी

# साखरा येथील जि.प.शाळेने घडविला इतिहास

## 'माझी शाळा, सुंदर शाळा' स्पर्धेत महाराष्ट्रात अव्वल

वाशीम, दि. ३ (प्रतिनिधी)

'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या योजनेअंतर्गत भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा साखरा, पंचायत समिती वाशिम, जिल्हा परिषद वाशिम. या शाळेला मुख्यमंत्री 'माझी शाळा,सुंदर शाळा' या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रामध्ये प्रथम पारितोषि पटकावुन जिल्ह्याचे नावलौकिक केले आहे.

जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, जिल्हाधिकारी एस. बुवनेश्वरी, जि. प. चे सीईओ वैभव वाघमारे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा आरोग्य व शिक्षण सभापती चक्रधर गोटे, शिक्षणाधिकारी राजेंद्र शिंदे यांनी शाळेतील सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.साखरा शाळेला हा बहुमान मिळवण्यासाठी जिल्हा प्रशासनाबरोबर, जिल्हा परिषदचे सर्व पदाधिकारी, अधिकारी आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र महाले आणि सर्व सदस्य, ग्रामपंचायत सरपंच अनिताताई पांडुरंग राऊतयांच्यासह ग्रामपंचायतचे सर्व सदस्य आणि मुख्याध्यापक अंबादास कऱ्हे यांच्यासह सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. समस्त गावकरी मंडळी आणि विद्यार्थी यांनीही अथक परिश्रम घेऊन शाळेला हा बहुमान प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. जि. प. चे माध्यमिक शिक्षणाधिकारी अहाळे, उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, उप शिक्षणाधिकारी गजानन बाजड, गट विकास अधिकारी गजानन खुळे, केंद्रप्रमुख अशोकराव महाले, केंद्रप्रमुख आनंद सुतार यांचेही मार्गदर्शन शाळेला लाभले आहे.




> गुणवत्तेच्या नावाखाली पालकांचा कल खाजगी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे असतांना साखरा सारख्या शाळांचा आदर्श जिल्हा परिषद शाळेच्या सर्व शिक्षकांनी घेण्यासारखा आहे.
>
> –चंद्रकांत ठाकरे
> अध्यक्ष, जि.प. वाशिम

> साखरा येथील जि. प. शाळा राज्यात प्रथम ठरली ही बाब आपल्या जिल्ह्यासाठी गौरवाची आणि सर्व जि.प. शाळांसाठी प्रेरणादायी आहे. यासाठी या शाळेतीचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मनापासुन खुप खुप अभिनंदन. तसेच शाळा व्यवस्थापन समितीसह शाळेच्या विकासात योगदान दिलेल्या सर्वसामान्य नागरिकांचेही खुप खुप अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा. जिल्ह्यातील इतर शाळा सुध्दा साखरा जिल्हा परिषद शाळेपासून प्रेरणा घेऊन त्यांच्या पावलावर पाऊल टाकत पुढे जातील अशी आशा आहे.
>
> –वैभव वाघमारे, सीईओ जि.प. वाशिम